The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
=====================================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
-----------------------------------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024
=====================================================================

# समर्थ रामदासांच्या : दखनी पदावल्या

**डॉ. शिंदेभारत विठ्ठलराव**

माधवराव पाटील माहविद्यालय, पालम

प्रस्तावना:

इ.स.1636 ते 1644 या कालखंडा मध्ये औरंगजेब हा दक्षिणेचा सुभेदार झाला होता. त्या कालखंडात महाराष्ट्रात अराज्यकता माजवली होती. अत्याचाराने थैमान घातले होते. मोगल सैनिकानी गाव च्या गावे लुटमार करून बेचिराख ककेली होती.हमाजात आपली दहशत निर्माण केली होती. मुलुख जाळुन बेचिराख केला होता. आत्याचाराचा वणव्यात भस्म होऊन गेले होते. सर्व सामान्य माणसाच्या संसारावर नांगर फिरवला जावू लागला. माणसाच्या आंतिल माणूसकी संपवून गेली होती. गुलामगीरीच्या बाजारात मनुष्यना कवडीमोलाने विकले जावू लागले. हरल्या शिपायांना गुलामगिरी पत्करून जीवण जगण्यास भाग पाडले जाऊ लागले . विकलेल्या गुलाम चुक किंवा कसूर झाली तर त्यांची कत्तल करण्याचे प्रकार घडू लागले. हिंदूंना मुसलमानाच्या अत्याचार पुढे झुकावे लागत असे . यापुढे त्यांना मुसलमान धर्म स्वीकारण्याची सक्ती केली जावू लागली . अनेक जणा मुसलमान सैन्यात दाखल होऊन चाकरी करावी लागत असे .महाराष्ट्रामध्ये सर्वत्र आराजगता माजली होती. हिंदू चेदैवतांचे वैभव संपले होते . आता मजीद, मजाहर,कबरी निर्माण होवू लागल्या होत्या .देश उजाडला जावू लागला होता . लोकांची वाताहात झाली होती .

लघु शोध निबंधाचे महत्त्व --

"समर्थ रामदासाच्या: दखनी पदावल्या"या विषयाची मांडणी या लघु शोधनिबंधा मधून करण्यात आलेली आहे. प्रस्तुत विषयाची व्याप्ती फार मोठी आहे.मरठी अभ्यासक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. आज तंत्रज्ञान कालखंडात हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे .परंतु या विषयीवर अनेकांनी संशोधन कार्य केले आहे. परंतु काळाच्या ओघात हा विषया लोकांपासून पासून दूर राहिलेले दिसते . प्रस्तुत विषयावर काही प्रमाणात प्रकाश झोत टाकण्याचे कार्य केलेले आहे. समर्थ रामदासांनी वेगळ्या विषयावर जे लेखन केले आहे. त्यांचे महत्त्व लक्षात घेऊन या विषयाची मांडणी करून प्रकाश झोत टाकला आहे. मनीष बाठे यांनी समर्थ रामदासांच्या : दखनी पदावल्याचा संशोधनपुर्ण अभ्यास केला आहे. त्यांनी आपल्या संशोधन वृत्ती मधून समाजा समोर दुर्लक्षित राहिले पण वेगळा विषय समोर ठेवला आहे. आज आधुनिक कालखंडात या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन मांडणी केली आहे. . श्री समर्थ रामदासांनी मराठी साहित्यामध्ये विपुल प्रमाणात लेखन केले आहे. की दासबोध, मनाचे श्लोक, रामायण , आत्माराम, स्फुट गद्य लेखन, लघु प्रकरणे, भारूड, आरत्या,अभंग आदि विषयावर त्यांनी लेखन केले आहे. श्री समर्थ रामदासांनी भारतभर भ्रमंती करून वेगवेगळ्या भाषेचा अभ्यास करून त्याना आपल्या साहित्यात स्थान देवून काही पदावल्याची मांडणी करताना दिसतात.आशा दुर्लक्षित राहिलेल्या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन प्रस्तुत विषयाची मांडणी केलेली आहे.

लघु शोध निबंधाची माहिती व विश्लेषण पध्दत—

"समर्थ रामदास: दखनी पदावल्या" या विषयाची लघुशोध निबंधाची मांडणी करताना मनीषा बाठे च्या दखनी उर्दू पदावल्या प्रस्तुत ग्रंथाचा आधार घेण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन ग्रंथचा हा मुख्य स्रोत आहे. या लेखनासाठी अनेक संदर्भ ग्रंथाचा वापर करण्यात आलेला आहे. अनेक विद्यापीठीय स्तरावरील चर्चासत्रातून

प्रसिध्द झालेल्या अहवालाचा या विषयासाठी आधार घेण्यात आलेला आहे. मासिक , वृत्तपत्र पाक्षिक व युट्रूब चा ही संशोधना साठी आधार घेतलेला आहे. आशा संशोधनाच्या आधारे या लघुशोधनिंबधाची मांडणी केलेली आहे. या सारख्या अनेक दुय्यमस्तरातील साधनांचा उपयोग केला आहे. संदर्भ ग्रंथाचा वापर करण्यात आलेला आहे . त्या बरोबरच इंटरनेटच्या साहयाने माहिती संकलित करण्यात आलेली आहे. प्रस्तुत लघु शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.विश्लेषात्मकपध्दतीतून लघुशोधनिंबधाचीमांडणी करून लेखन केलेले आहे.

श्री समर्थ रामदास स्वामी--

श्री समर्थ रामदास स्वामींनी आपल्या साहित्यातून सामाजिक विषयांची लेखन करताना दिसतात. श्री समर्थ रामदास स्वामींनी जनतेच्या प्रश्न भाष्य करताना दिसतात.सामाजिक चित्रण साहित्य मधून प्रतिबिंब उमटले दिसते. अशा सामाजिक, राजकीय, परिस्थितीचे समर्थ रामदासांनी “आस्मानी – सुलतानी” या प्रकरणातून वर्णन केलेले आहे.

“किती एक ग्रामचि ते ओस पडली ! पिके सर्वधान्ये चि नाना बुडाली !!
किती एक धाडीवरी धाडी येती ! व्दयां सैनिकाचेनि संहार होती !1!
किती एक ते धान्य लुट्रूनी नेती. ! किती एक ते पेव खणानि नेती” !!

श्री समर्थ रामदासांनी आपल्या राज्याचे सामाजिक विषयांवर आधारित वर्णन करताना दिसतात. वरील ओळीतून असे लक्षात येते की , मुसलमान सत्तेमुळे गावच्या गाव ओस पडली जावू लागली. सर्वसामान्य जनता आपला जीव वाचविण्यासाठी आपल्या जिवलगा पासून दूर जाऊ लागले जीव वाचवण्याचार प्रयत्न केला जाऊ लागला. सर्वसामान्य प्रजा होरपळून निघू लागली. आस्मानी आणि सुलतानी पाट्यावर भरडले जाऊ लागली .जिकडे बघावं तिकडे लूट आरजकता माजली जावू लागली. स्त्रियांची बेअब्रू लुटली जावू लागली. समाजात अंनागोदी माजवली होती. अत्याच्यार अंधकारात समाज भरडला जावू लागला. अशा स्वधर्म, स्वराष्ट्र, स्वराज्याची, स्व- स्वत्वहीन समाजाला कोणत्याही प्रकारची चाड राहिलेली नव्हती.

“तव तो गल्बला जाला परचक्र आले! अकस्मात धाडी आली ! कांता बंदी धरूनी नेली”

महाराष्ट्रात पर चक्र आल्याने त्यांच्या वर अकस्मात धाडी पडू लागल्या . स्त्री-पुरुष यांना गुलाम बनवले जाऊ लागले. जिकडे बघावे तिकडे सोयराच्यार माजला होता . परचक्रच्या वरवंट्याखाली सर्वसामान्य जनता भरडली जावू लागली . महाराष्ट्र असो की (भारत भूमी), देशातल्या वेगवेगळ्या प्रांता ही अवस्था दिसून यवू लागली.

समर्थ रामदासाचे चरित्र:

समर्थ रामदासांचे मूळ कुटुंब हे बेदर प्रांता मध्यले आहे . नवव्या शतकाच्या अखेरीस राज्यक्रांती व दुष्काळामुळेबेदर प्रांत त्यांनी सोडून कुटुंबानी स्थलांतर केले दिसते. रामदासाच्या पूर्वज कृष्णाजी पंतांचे ठोसर यांनी शके ८८४ मध्ये गोदातिरी मोजे हिवरे तालुका खेड येथे स्थायिक झालेचे काही पुरावे आहेत . कृष्णाजी पंत ठोसर याना पाच मुले होती 1) कंचोपंत 2) रघोपंत 3) हरीपंत 4) आत्मारामपंत 5) दशरथपंत पहिले चार बेदर प्रांतात जन्माला आलेली होती. पाचवा दशरथ पंथ हा गोदातीरी झाला. ‘ठोसर’ घराण्यातील कृष्णाजी पंतापासून रामदासाच्या वडीला पर्यंत म्हणजे सूर्याचीपंता पर्यंत बावीस (22) पिढ्या गोदातीरी वास्तवास होत्या.

सूर्याचीपंतास दोन मुलं होती 1) गंगाधर उर्फ रामी रामदास 2) नारायण उर्फ रामदास पहिला पुत्र गंगाधर उर्फ रामी रामदास यांची पाचव्या वर्षी मुंज करण्यात आली.आंबे वडकराची देशमुखाची कन्या पार्वतीबाई हिच्याशी वयाच्या सातव्या वर्षी विवाह संपन्न झाला . राणूबाईने म्हणजेच रामदासाच्य आईने पहिले व शेवटचे सन्मुख पाहिले . यानंतर सूर्याची पंत येहलोकी गेले. सर्व कुटुंबाची जबाबदारीही त्यांच्यावर पडली. सूर्याची पंथ व राणूबाई यांना दुसरा पुत्र शके 1530 इसवी 1680 चैत्र शुद्ध नवमीला दुपारी बारा वाजता जन्म झाला. श्रीराम नवमीच्या दिवशी श्री समर्थ रामदासाचा जन्म झाला. जन्म गाव जाबं हे आहे. लहानपणी त्याचे नाव म्हणून नारायण ठेवण्यात आले.पुढे ते समर्थ रामदास म्हणून प्रसिद्ध झाले. रामदास हे लहानपणापासून खोडकर प्रवृत्तीचेहोते . घर प्रपंचातपासून दूरच होते . त्याचा उपयोग कुटुंबासाठी होत नव्हता. अभ्यासात लक्ष घालीत नव्हते. म्हणून म्हणून रामदासाचे लग्न करण्याचा घाट घालण्यात आला होता. परंतु रामदास स्वामी ने जांब येथील आपल्या लग्नाच्या मंडपात धुम ठोकली (शके 15 42) मध्ये पळू गेले . अनेक वर्षे तपश्चर्या केली दासबोध, मणांचे श्लोक,करूणाष्टके,एकवीस समाधी, आत्माराम , रामायण,ओव्या,स्फुटओव्या,पंचीकरणयोग , मानपंचक, पंचमांश, भारूड अभंग,आरती इ.रचना निर्माण केली गेली होती. शके 1599 मध्ये त्यांचा देहवासन

समर्थ रामदासाची भारत भ्रमण यात्रा-

श्री समर्थ रामदासांनी 1632 ते 1664 या कालखंडात भारतभर भ्रमंती केली . त्या निमित्ताने त्यांच्याचा संबंध उत्तर भारतात आणि दक्षिण भारतातील प्रात्ताशी संबंध आलेला दिसतो. दखनीतील उर्दू, कन्नडा, तेलुगु व अरबी याही भाषा काही प्रमाणात अवगत केलेल्या दिसतात . त्यांच्या शब्दांचा वापर त्यांनी लेखनशैलीत केलेला दिसतो. उत्तरेकडील काही प्रांत पंजाब, गुजरात, मारवाडी व अवध याही प्रांतात भ्रमंती केल्याने त्याही भाषेचा वापर करण्यात आलेला आहे. भ्रमंती करताना त्यांच्या बोलीभाषेचा अभ्यासा कलेला दिसतो या बोलीभाषातील पदावल्या लक्षात येते . सोळाव्या शतकात दखनी उर्दू भाषेतील अठरा बोलीभाषाचा आपल्या लेखनातून समावेश केलेला दिसतो. श्री समर्थ रामदासांनी पदावल्या लेखनासाठी तेरा बोली भाषेचा वापर करण्यात आलेला दिसतो . ज्या मध्ये अरबी, फारशी, तुर्की व संस्कृत खडेबोली भाषेचा वापर करण्यात आलेला दिसतो.दखनी बोलीभाषाचा वापर करतान खडीबोली ,भोजपुरी, हरियाणा, राजस्थानी पहाडी, गोंडी व हैदराबादी आदी बोलीभाषेचा वापर करण्यात आलेला दिसतो. यामधील बोली भाषेतील अनेक शब्दांचा वापर करण्यात आलेला आहे. श्री समर्थ रामदासनी दखनी पदावली मध्ये वर्ण केलेला दिसून येते . आशा अनेक शब्दाचा वापर करण्यात आलेला आहे .श्री समर्थ रामदासांनी बोलीभाषेवर आपले प्रभुत्व सिद्ध केले दिसते. दखनी पदावल्याचे सामर्थ्य प्रभुत्ववाची साक्ष दिसून येतो.

दखनी पदावल्याचा बोलीभाषेत निरूपण ---

श्री समर्थ रामदासांनी भारतभर पायी भ्रमंती 16 व्या शतकात केली दिसते . आयोध्या पासून ते तंजवर आणि हैदराबाद पर्यंतचा पायी प्रवास करताना तेथील सामाजिक , राजकीय सांस्कृतिक यांचे चित्र उघड्या डोळ्यांनी पाहिले दिसतें. भारत भ्रंमती पायी प्रवास करतांना समर्थाचा अनेक लोकां समुदायाशी संपर्कात आल्यामुळे अशा समुदायाशी नवे नाते निर्माण झाले. परप्रांतीय ग्रामीण समुदायाशी समर्थ रामदासांनी नाळ जोडली गेली.नवभाषाच्या संपर्कातने नवा समुदाय जोडला जाऊ लागला. श्री समर्थ रामदास स्वामींनी आपल्या लोकांच्या दु:ख उघड्या डोळ्यांनी पाहिले. त्यांच्यावर अनेक प्रश्न विचारताना दिसतात.

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
================================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
------------------------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024
================================================================

पिरोंके पगोंसे हमें ने तलाई ! अछि भात सेंहि बातया ईलाई !
सुन्हों साथ भाई कहुं येहि माना ! कहे रामदासो अकल्से पछाना !

श्री समर्थ रामदास स्वामी असे म्हणतात की, मनुष्य स्वतःला फार मोठा आणि सज्जन समजतो . परंतु भगवंता पेक्षा मोठा कोणीच नाही. हे मात्र विसरून जातो. कोणता धर्म चांगला आहे कोणता वाईट आहे ही चर्चा करत बसण्या पेक्षा स्वतःच्या समाजाची सुधारणा करून समाजाचे आणि स्वतःचे जीवन सुंदर आणि चांगले करावे हीच अपेक्षा व्यक्त करताना दिसतात.

उदंड खस्तची कामे ! मर्द मारूनही जातेस
नामर्द काय ते लंडी ! सदा दुश्चित लालची
मर्द तकवा सोडू नये ! म्हणून प्राप्त होय जय (1)

श्री समर्थ रामदास आपल्या दखनी बोली भाषातून समाजतील वास्तववादी चित्रण उभे केले आहे. मांडताना अन्याय करणारा मर्द स्वतः ला शूर बलशाली समजतो कारण तो नामर्दवर अन्याय करणे हेच तो शुरपणा मानतो. स्वतः ला बलाशाली आणि अन्याय सहन करणाऱ्याला नामर्द समजले जाऊ लागले . समाजाची अशी स्थिती का निर्माण झाली . या विषयावर वरिल ओळीतून मांडतात मनुष्य स्वतः जयाच्या पाठीमागे लागताना आहे .आशा आशयाचे वर्णन श्री समर्थ रामदास केलेले दिसते. स्वः गमवून बसत चाललेल्या समाज हा लाचार झालेल्या दिसतो. समाजाला नवी उभारी देण्याचा प्रयत्न केला गेला आहे .समाज हा विकलांग बनत चालेला दिसतो . परकीय शक्तीच्या धाकात राहुन गुलामगिरीचे लाचारीचे जीवन जगताना दिसतो . अशा समाजाच्या पाढीमागे श्री समर्थ रामदास समर्थपणे पाठीमागे उभे राहिलेले दिसतात . निराशेतून बाहेर काढण्यासाठी समर्थ रामदासांनी त्यांच्या अंतरंगामध्ये वैचारिक क्रांती रूपी मशाल पेटून नवसंजीवनीची पेरणी करूंन समाजाला नवीन ताकत देण्याचा प्रयत्न केला आहे. श्री समर्थ रामदासनी हा प्रयत्न कर्तसुधारकाचा आहे.त्यांच्याच बोली भाषेचा वापर केल्यामुळे त्यांना हा विचार आपलेसे वाटल्या यातून नवीन नाते निर्माण होवू लागले समाजाला नव उभारी देण्यासाठी प्रयत्न केलले आहेत . तत्त्वज्ञान हे त्यांच्या हृदयामध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

"पानि में प्यासा मुवा रे आलम. ! तिरत तिरत ज्यात कमाखल धुंडत रहे कुवा" !

पाण्या मध्ये राहून तहानलेला असावावे हे कसा व्याकूळ होतो आणि तहानलेला राहावे हे कसे असते यांचे उदाहरण देताना जग हे असे कसे आहे . कोणीही सांगितो आणि मुर्खा सारख्या त्यांच्या पाढीमागे राहू नये ही अपेक्षा व्यक्त केली आहे. .म्हणून ते मूर्खासारखे तीर्थयात्रा , नद्याच्या परिसरात भ्रमंती करून ईश्वराला शोधताना दिसतात. ज्या प्रमाणे विहिरी पुर्णपणे पाण्याणे भरलेले आहेत. आशा वेळी विहीरत पाण्याला शोध फिरणे म्हणजे मुर्खपणा आहेना . तोंच समाजात प्रकार दिसतो.अंनागोदी सोयराच्यार माजवले दिसतो . हे.असेच म्हणावे लागेल या विषयावर समर्थ रामदास भाष्ये करताना दिसतात.

"तुम पहु डामेरे लालना ! कनक सरी शय्या बनाउं !
रतन जडित तेरे झुलना ! मया जसोदा झुले झुलावे !
आवे तुम्हें नींद मन मोहना" !!

आशा पद्धतीची भावुकता त्यांच्या स्वरात दिसते . श्री रामदास यशोदा आणि श्रीकृष्णाचेही वर्णन करताना दिसतात. कारण सुख कशात आहे हे मान्यवर असते. रत्नजडित पाळणा झाला म्हणजे झोप येईल याची खात्री नसते. त्याचं प्रमाणे जोपर्यंत माणसाच्या मनाला शांती मिळत नाही तोपर्यंत त्याला सुख मिळणार नाही. मग बुवाबाजीच्या नांदी लागून सुख कसे मिळेल. आशी खोटी ज्ञानचे मार्ग मानवाला पंचनार नाहीत . श्री समर्थ रामदासांनी त्यांच्या बोली भाषेचा वापर करून त्यांचे कान टोचले दिसतात. दखनी पदावली मधून ते मांडताना दिसतात . दखनी उर्दूतील मधील काही बोलीभाषेचे वापर केला आहे. आशा काव्यगुणाचे असलेल्या दखनी पदावल्या मधून उलगडत जाताना दिसते . दखनी बोली भाषेचा समर्थ रामदास वापर करून घेतला आहे.

खुणखुण खुणखुणझॉ गरियाबाजे ! झल झल झल दंत लखलख देखत
डुल्लत खळ खळ झोकुन क्षिती थरथर कापे !

खुळ खुळ असा घुंगराचा आवाज होत आहे.झळकणारे दातचा लखलखणारा प्रकाशित दात पाहून पृथ्वी थरथर कापू लागते. असेही वर्णन केलेले आहे. आशा दखनी पदावल्यात बोलीभाषाचा वापर करण्यात आलेला आहे.

दखनी पदावल्या (मुसलमानी अष्टके) –

श्री समर्थ रामदासांनी दखनी किंवा उर्दू भाषेतून काही पदावल्या लिहिलेल्या गेलेल्या आहेत . यांचे संकलन "मनीषा बाठे" यांनी केले आहे.अतिशय चिकित्सक व जिज्ञासू वृत्तीने संशोधन प्रवृत्तीने काम केलेले दिसते .प्रस्तुत ग्रंथ म्हणजे समर्थ रामदासाचा व्यासांगी व्यक्तिमत्वाची नव्याने ओळख करून देली होय.समर्थच्य व्यक्तीमत्वाला मधील अनेक नवं पैलू मराठी वाचका समोर उलगडून दाखविण्यात आले आहे. श्री समर्थ रामदास स्वामी अंगीचे पैलू बहु अंगी व्यक्तिमत्वाची अभ्यासपूर्ण व्यासंग समोर आलेला आहे. .इसवी सन १६३२ ते १६६४४ या कालावधीमध्ये श्री समर्थ रामदासांनी 300 दखनी उर्दू पदावल्या लिहिलेल्या गेल्या आहेत. "मुसलमानी अष्टक" असे म्हटले जाते. पदावल्या मधून एका समोरच्या व्यक्तीच्या व्यक्तीमत्वचे दर्शन होताना दिसते . उत्तुंग काव्यंचे सौंदर्याने ओतप्रोत भरलेले हा ग्रंथ आहे. काव्य सौंदर्य दिसून येतो. दखनी पदावल्या (मुसलमानी अष्टक) या ग्रंथात 99 पदावल्या लिहिल्या आहेत. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे हिंदू मुस्लिम ऐक्याचा ग्रंथ आहे. या ग्रंथातून श्री समर्थ रामदास हे समाजातील लोकांना शिक्षण देण्याची प्रवृत्ती दिसून येतात . त्याबरोबरच समाज संघटक अशा भुमिकेत दिसतात . समर्थ रामदास दखनी पदावल्या मधून वेगवेगळे भुमिका मांडताना दिसतात . श्री समर्थांचा व्यासंग तेवढा व्यापक होता की, तत्कालीन दखनी उर्दू भाषेतील एकूण 18 बोलीभाषा भाषेची ओळख त्याना होती . दखनी पदावल्यातून भाषीक संवादातून मांडणी करताना दिसतात. सर्वसामान्य माणूस समजण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी त्यांच्या बोली भाषेचा लेखनासाठी समावेश केला दिसतो. समर्थानी दखनी 13 भाषा मध्ये पदावल्या लिहिलेल्या आहेत .

"मनीषा बाठे" यांनी वेगवेगळ्या मठात जाऊन तेथील लेखन साहित्य व अनेक ठिकाणची जाऊन भ्रमंती करून बांडे शोधली आणि प्रस्तुत ग्रंथचे संशोधन करून हा ग्रंथ समोर आणला आहे . इसवी सन 1632 ते 1644 या कालावधी समर्थांनी भ्रमंती करताना लिहिला अनेक पदावल्याची रचना केली आहे. दखनी पदावल्या व त्याचा अर्थ सांगण्यात आलेला आहे. तशी या ग्रंथाची रचना संवाद आत्मक स्वरूपाची आहे. समर्थ आपल्या

काव्याच्या माध्यमातून आपल्याशी जो संवाद साधला आहे . दखनी पदावल्या (मुसलमानी अष्टक) मधून ते संवाद करताना दिसतात. श्र समर्थ रामदासांनी आपल्या शिष्यरूपात संवाद साधतात दिसतात. त्यासाठी समोर असणाऱ्या श्रोत्यांना भाई असे संबोधतात आणि पदाच्या शेवटी "काहे रामदास," याचाही वापर करतात दिसतात. दखनी पदावल्यातून समाजातील बोली भाषेचा वापर करताना दिसतो.

ईश्वर आणि अल्ला यांच्यात भेदाभेद नाही-

श्री समर्थ रामदासांनी "दखनी पदावल्या" ( मुसलमानी अष्टक )मधून सर्वच सांप्रदायातील भक्तीचे वर्णन केले आहे. ही एकाच शक्तीचे वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते . आपल्याला उच्चार नुसार त्यांना नावे दिली आहेत. त्यानुसार प्रत्येक संप्रदायांमध्ये ईश्वराला(शक्तीला) वेगवेगळ्या नावाने संबोधताना दिसतात. यालाच हिंदू धर्मात कोणी श्रीराम, महादेव , देव ,आत्माराम ,परब्रम्ह व ईश्वर अशा नावाने संबोधताना दिसतात. त्याप्रमाणे इस्लाम संप्रदायत अनेक नावांनी पुकारले जातात. मुसलमान संप्रदायांमध्ये पैगंबर ,पीर, मौलाना , खुदा, अल्ला व रहीम यासारखे नावाने ईश्वराला अशा नावांनी संबोधले ओळखले जाते. ईश्वराला वेगवेगळ्या नावाचा वापर करताना दिसतो . अल्ला किंवा ईश्वर असो यांच्यात मुळातच किंवा अंशतः कोणत्याही भेद नाही. प्रत्येक जण वेगवेगळया नावाने संबोधले जात असले तरी प्रार्थना करतान दिसतात. परंतु सर्वांना एकाच जागेवर जायचे आहे. वेगळे वाटत असेल तरी शेवटी विलीनाचे एकाच स्थान आहे . विलीन व्हायचे ते भूमीत आहे.. त्या शक्तीला वेगवेगळ्या नावाने संबोधताना दिसतात. याविषयीचे सर्मथ रामदास स्वामी ने सुंदर विवेचन केले आहे.

दुन्या काहि धंदा सबों छोड देना ! दुन्यादो दिनोंकि दुन्याहिन होना !
अच्छी है राहा पिर पैगंबरोंकि. ! कहे रामदासो पकर्बे ईनोकि ! (2)

समर्थ रामदास आपल्या दखनी पदावल्या मधून समाजा समोर एक नवा आदर्श ठेवतांना दिसतात.प्रेत्यकण आपल्या परीने आयुष्य जगत असतो . सर्वांनाच आयुष्य अल्पसे मिळाले आहे. मग ते आपण वाईट का करता. व्यसनाच्या पाठीमागे लागुन आयुष्यची राखरांगोळी का करून घेतो. आपणाला विसरून चालणार नाही. मनुष्याने व्यसनाच्या आहारी न जाता जीवन आनंदमय सुखमय जंगले पाहिजे. मनुष्याच्या मृत्यूनंतर कीर्तीरूपात पाठीमागे राहिले. पुढे कोणी पैगंबर म्हणे कोणी रामदास म्हणे परंतु सर्वांना एकाच वाटेवर जायचे आहे. अल्ला आणि ईश्वर यांच्यात भेदाभेद कशासाठी करायची आहे . अनेक प्रश्न उभा केलेले आहेते .

श्र्वावत विचाराची व्यापकता--

श्री समर्थ रामदासांनी समाजा समोर नवा एक आदर्श निर्माण केला आहे . आपले आयुष्याच्या वाटेवर मनुष्यानी भेदाभेद निर्माण करू शकत नाही . नवविचारने उच्च असावेत . मनुष्यानी आप आपसात हेवे दावे करू नये. आपले जीवन न्याय पध्दतीचे वर्तन करावेत .आर्चणा शुध्द असावेत. व्यवाहारीक विचारा मध्ये व्यापकता आणने गरजेचे आहे . समर्थ रामदासांनी याविषयी दखनी पदावल्या मधून किंवा( मुसलमानी अष्टका) मधून मांडनी करताना दिसतात असे म्हणतात की, मनुष्य बोलताना फरकामुळे मानवाचे मन दुःख ठेवणार नाही ही काळजी घ्यावी लागते. वेगळे शब्दचित्र बदलून वेगवेगळ्या अर्थ काढण्याची गरज नाही. . उद.रामाने लंका घेतली असे न म्हणता रहिमने घेतली असे म्हणतात. मग राम आणि रहीम एकच आहेतना

अशा विचाराचे व्यापकता समर्थांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे . गळ्यात रामाची माळ आहे असे न म्हणता रहीमची माळ आहे असे म्हणतात दोन्हीचा अर्थ एकच आहेना .मग राम आणि रहीम यांच्यात मुळीच भेद नाहीना . खरा परमेश्वर हा कुठे आहे .ना मुसलमान माहिती ना हिंदूंना माहिती. आपण ईश्र्वरची शब्दाची व्यापकता लक्षात घेऊन मांडणी करावी. ही संकल्पना लक्षात आली तर असे लक्षात येते की,तो सर्वात आहे. मग सजीव असो वा निर्जीव वस्तू मध्ये सुद्धा असत्वी दिसते धर्माच्या नावाखाली भेदाभेद का करतात . समर्थांनी आपले तात्विक संघर्ष बाजूला ठेवून विचारांची व्यापकता दाखवली आहे

"नहि वो मुसलमान हिंदू कुछुहि ! सयथ्बी नहि क्या कहुं मे ईसेहि !
सर्बोज्यातसे लोह हिरे निराला ! कहे रामदासो चला वेहि सारा !
सर्बोज्यात मोंहि हाहि बस्त यहि ! ईनो कि कहुं ज्यात सें कोण भाई !
नाहि त्यात ना गोतसे सो निराला ! कहे रामदासो ये आला !(3)

अंधश्रध्दावर प्रहार –

खुदाकेहि वास्ते फकिरिहि लेना ! सबो से मलाई लडाई न कर्ना !
मला साधी सो वो हरामी न लवे ! खुला हआलसएंहइ मिला तोहि खावे !

श्री रामदास स्वामींनी दखनी पदावल्या मधून समाजातील वाईट प्रथा वर प्रहार केला. अंधश्रध्दा पासून समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. संत साहित्याने "शहाणे करून सोडावे सगळे जण" या संत वंचना प्रमाणे लोकांना उपदेश करतांना दिसतात. जो समाज आचरणाने आपल्या विचाराने जो समाज झोपलेचे सोंग घेऊन वाईट प्रथांना पृष्ठीकरतो . आशा समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे .त्यांनी मुसलमान समाजातील अनेक वाईट प्रथांना थेट प्रश्न विचारूना करून त्यांच्यातील अंधश्रद्धेवर कडकडून प्रहार करू शकल्याचे दिसते.

"करामत्करे सो भुलाहे दिवाना ! ईनो काक हंसो इनो का समज्जे तुमाना !
करामत बुरि हे भुतों देवतों का ! ना कर्ना कबों बंदगी हि ईनोकि !(4)

समाजात जादूटोणा चमत्कार अशा वेगवेगळ्या प्रथांना समाज भुलला आहे . त्यामुळे समाजा मध्ये अंधश्रद्धा चे मोठ्या प्रमाणात पेव फुटले दिसते . यांचे सुंदर उदाहरण दिले आहे.ज्या पद्धतीने एखादा कावळा पांढरा रंग लावून स्वतःला हंस समजतो त्याप्रमाणेच हेजादू करणारे असतात . चमत्कार करून समाजाला वाईट प्रथा रुजूवून त्या समाजावर अंकुश ठेवतात. त्यामुळे दहशत निर्माण होते. मग समाज भिंतीतून गुलामगिरी पत्करताना दिसते. त्यांच्याकडून वाईट कर्म करून घेणे हे मोठ्या प्रमाणात वाढले जाते .यावरच स्वामी रामदासाने आशा अंधश्रध्दा प्रहार केलेला दिसून येतो.

कर्मकांडातून बाहेर काढणे –

श्री समर्थ रामदासांनी आपल्या समाजातील कर्मकांडला विरोध केला आहे.मुसलमान समाजातील अनेक कर्मकांड विषयावर खडे सवाल केले आहेत. हे सवाल करताना त्यांच्या मनात त्यांच्या समाजा विषयी वाईट विचार नाहीत. उलट त्यांच्या विषयी मनात कमालीची कण्व आहे. ते सदैव सत्याची बाजू समोर मांडताना दिसतात. वाईट हे वाईटच असते मग आपले असो की दुस्र्याचे असो या विषयावर विरोध करताना समर्थ रामदास स्वामी दिसतात. भुलथापा न मारता ते सदैव सत्याचाच आग्रह करतना दिसतात . त्यांच्या मनात

त्यांच्या बद्दल स्पष्ट पणाने कर्मकांडाच्या बागुलबुवाला बाहेर काढणे.नविन विचार नी घाबरलेल्या समाजाला ममतारुपी ने शब्दाने जागृतीनिर्माण करण्यासाठी प्रयत्न आहे. समाजाला संपूर्णपणे खरबडून जागे करण्याचा प्रयत्न समर्थ करताना दिसतात. "देखज" या कल्पनेवर या कल्पनेवर समर्थ रामदासांनी हल्ला चढवलेला दिसतो. "देखज" म्हणजे नरक होय. मृत्यूनंतरहोणाऱ्या शिक्षेचे भय बाळगून जगणे होय . अशा इस्लामिक धर्मातील संकल्पनेवर प्रहार केला. हिंदू धर्मातील वाईट चालीरीती त्यांनी हल्ला केलेला दिसतो. आपल्याला त्यांचे वेगळेपण कदाचित जानवर नाही. पण सृष्टीतील प्रत्येकाचा नाश हा अटळच आहे . मृत्यूहे अटळ सत्य आहे. शेवटी प्रत्येकाला एकटनेच यायचे आणि जायचे आहे. त्यामुळे कोणीच श्वावत नाही. ही वेळ प्रत्येकाला येणार आहे. मृत्युनंतरची भिंती का जे भित्ती दाखवनारे एकना एक दिवस जाणारं आहेत ना मग त्यांना भित्ती नाही मग तुम्हालाच का. भित्त ही दाखवणाऱ्या ही वेळ येणार नाही का. शासक असो गुरू असो अशी वेळ ही प्रत्येकावर येणार आहे .हिंदू धर्मातील चुकीच्या प्रथावर जे आसूडले ओढले तेच आसूड मुसलमान धर्मातील वाईट प्रथावर ओढताना दिसतात .मग हा आपला धर्म हा त्यांचा असा विचार न करता वाईटला वाईट म्हणतात.

"जेणे निरसे हे अज्ञान, तया नाव ब्रह्मज्ञान ! अज्ञानास भेटता अज्ञान, तेथे कैचे सापडेल ज्ञान"!(5)

साध्या सोप्या शब्दातून ज्ञान सांगण्यासाठी इतक्या सोप्या शब्दातून अर्थ मांडला आहे. समर्थ रामदासांनी दखनी पदावल्या मधून ज्ञानाचे महत्त्व विशद केलेले आहे . मनुष्याने हा मुळातच अज्ञानी आहेत दुसरा अज्ञानी मनुष्य जवळ गेला तर तो ज्ञानी होणार आहे का. आशा लोकांना ज्ञान मिळाले याची खात्री आहे या विषयावर त्यांनी निरूपण केले आहे.

नही बाद के बाद भाई तमन्ना ! रही रहीम कही बाणा चलना
देवाचा खराबंदा कहे बात वैसा ! राह से चलो सो !

भाषाशैली –

दखनी पदावल्या मधून (मुसलमानी अष्टक) समर्थ रामदासांनी जी श्लोकाची रचना केलेली आहे .सर्व ते सर्व श्लोक भुजंग प्राय वृत्तांतात लिहिले आहेत . उर्दू भाषे मध्ये न दिसणारे ' ळ ' चा वापर चांगल्या रीतीने केलेला दिसून येते. व्यंजन किती चपखल जागी येऊन बसलेले दिसते.त्यान तोंडून मोडून वापर करण्याची गरज त्यांना भासली नाही.याचे अनेक उदाहरण पदावल्या मधूनच दिसते . बोली भाषेचे सौंदर्य अधिक खुलून दिसते पदावल्या मध्ये बोलीभाषाचा वापर केला आहे. उत्तर प्रदेशा भाषाचा वापर करून आशा अनेक शैलीचा वापर केला आहे.त्याच्यां चालीची गीताची स्वरूपात रचना केली. भाग पाग ले काना भाग गीतामधून अवध लोकगीतातून गीत रामायण, ब्रज भाषेतील मांडणी केली आहे. कृष्ण लीला त्यांनी पहाडी भाषा शैलीतून मांडणी करताना दिसतात.शिवकाव्य हे सुद्धा सामाजिक लोकगीता मधून मांडणी करण्यात आली आहे. श्रीराम कृष्ण प्रेमलिला व बाललीलाचे वर्णन केलेले आहे . गाथा कथन करणारे अनेक गीते मांडलेले दिसतात. भाषा रोखठोकपणाने व्यक्त होतात दिसतात. संतांच्या भाषेतील मार्ग पण आलेला आहे . सहज सोपे शब्दांचा वापर केला आहे . सर्मथ रामदास त्यांना कधीच शब्दांच्या कोटया करून बसवण्याची गरज भासली नाही.

सांराश--

श्र समर्थ रामदासांनी दखनी पदावल्या( मुस्लिम अष्टक) या मधून मांडणी करतांना दिसतात.कुं प्रथावर आणि वाईट प्रथावर प्रहार केलेला दिसून येतो. दाखनि भाषेतील तेरा बोलीभाषांचा वापर कलेला दिसतो . श्री

समर्थ रामदास स्वामींनी ज्ञान भाषे मध्ये न मांडताना दिसतात त्यांना बोलीभाषेचा वापर करताना दिसतात. श्री समर्थ रामदास हे महाराष्ट्राचे न राहता भारतीय लोकाचे होताना दिसतात. नाही संत नामदेव महाराजांनी अटकेत , पंजाब पर्यंत त्यांनी आपल्या लेखनातून ठसा उमटविला दिसतो .संत नामदेवांनी भारतभर भ्रमंती करून आपला वेगळा ठसा उमटविला त्याच बरोबर रामदासांनीही हा ठसा उमटविलेला दिसतो.

संदर्भ --

1) दखनी उर्दू पदावल्या –मनिषा बाठे –समर्थ मिडिया सेंटर पुणे (बांड क्रंमाक 668) पृ..क्रं.27

2)दखनी उर्दू पदावल्या – मनिषा बाठे –समर्थ मिडिया सेंटर पुणे ( बाड क्रंमाक668 )पृ .क्रं.112

3) -तदैवत पृ.क्रं83

4) लोकसत्ता लोकरंग वृत्तपत्र14 जुन 2015 पेज क्रंमाक(8)

5) तद्वत पृ.क्रं .(1)